महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १४ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# भाजपच्या नवीन जिल्हाध्यक्षांची यादी जाहीर

## राज्यात ५८ तरुण चेहऱ्यांना संधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने पक्ष संघटनेत महत्त्वाचे बदल केले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुकांनंतर भाजपने वरिष्ठ नेते रविंद्र चव्हाण यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याऐवजी पक्षीय स्तरावर मोठी जबाबदारी दिली. भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपने संघटन पर्व अभियान राबवले. त्या माध्यमातून भाजपने तब्बल दीड कोटी सदस्य नोंदणी पूर्ण केली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ही रणनीती आखण्यात येत आहे. त्यातच, आता भाजपने राज्यातील सर्वच जिल्ह्यांसाठी भाजपच्या (BJP) 58 जिल्हाध्यक्षांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये, मुंबई जिल्हाध्यक्षपदासाठी 3 पदे तयारी करण्यात आली आहे. उत्तर मुंबई, उत्तर पूर्व मुंबई आणि उत्तर मध्य मुंबईसाठी जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये, अनुक्रमे दीपक तावडे, दीपक दळवी आणि विरेंद्र म्हात्रे यांना जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्र भाजपमध्ये संघटनात्मक



भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हा अध्यक्षपदी जितेंद्र डाकी

फेरबदल करण्यात आले असून अखेर भाजपकडून नव्या जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. राज्यातील मंडळ आणि तालुका अध्यक्षांच्या नेमणुकीनंतर भाजपकडून जिलाध्यक्षांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. भाजपचे प्रदेश निवडणूक निर्णय अधिकारी चैनसुख संचेती यांच्या सहीने भाजपकडून परिपत्रक जारी करत नव्या जिल्हाध्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपने कोकण, पश्चिम महराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबईत अशा प्रदेशात राज्यातील 36 जिल्ह्यात एकूण 58 जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या




## भाजपा कल्याण जिल्हा अध्यक्षपदी नंदकिशोर परब

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शरद शहाणे कल्याण ग्रामीणचे सरचिटणीस नंदकिशोर उर्फ (नंदू परब) यांची भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे भाजपा प्रदेश अध्यक्ष बावनकुळे यांनी नंदकिशोर परब यांची कल्याण जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. नंदू परत हे रवींद्र चव्हाण यांचे कट्टर, विश्वासू समर्थक असून परब यांनी आजदे ग्रामपंचायत सदस्य पासून आता जिल्हा कल्याण जिल्हा अध्यक्ष पर्यंत राजकीय प्रवास केला आहे.मजबूत पक्ष बांधणी, विश्वासू आणि कष्टाळू कार्यकर्ते निर्माण करणे हे त्यांचे कार्य आहे.

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने राज्यामध्ये नव्या जिल्हाध्यक्षांची नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली असून आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काही महत्त्वाचे बदलही करण्यात आले आहेत. भाजपच्या कोकण जिल्हाध्यक्षांची यादी खालील प्रमाणे आहे**

| जिल्हा | नाव |
|---|---|
| सिंधुदुर्ग | श्री. प्रभाकर सावंत |
| रत्नागिरी उत्तर | श्री. सतिष मोरे |
| रत्नागिरी दक्षिण | श्री. राजेश सावंत |
| रायगड उत्तर | श्री. अविनाश कोळी |
| रायगड दक्षिण | श्री. धैर्यशील पाटील |
| ठाणे शहर | श्री. संदिप लेले |
| ठाणे ग्रामीण | श्री. जितेंद्र डाकी |
| भिवंडी | श्री. रविकांत सावंत |
| मिरा भाईंदर | श्री. दिलीप जैन |
| नवी मुंबई | डॉ. राजेश पाटील |
| कल्याण | श्री. नंदु परब |
| उल्हासनगर | श्री. राजेश वधारिया |




थोडक्यात महत्वाचे

## कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : कल्याण तालुक्यातील एकूण ४१ ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत आज मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी कल्याण तहसिल कार्यालयात काढण्यात आली असून ४१ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.**

- अनुसूचित जाती ३ ग्रामपंचायती = २ स्त्री १ पुरुष
- अनुसूचित जमाती 3 ग्रामपंचायती = २ स्त्री १ पुरुष
- नागरिकांचा मागास प्रवर्ग ११ ग्रामपंचायती = ५ स्त्री ६ पुरुष
- खुला प्रवर्ग २४ ग्रामपंचायती- १२ स्त्री १२ पुरुष

**अनुसुचित जाती**
१ वासुंद्री-स्त्री
२ आणे भिसोळ - स्त्री
३ कंबा - सर्वसाधारण



**अनुसुचित जमाती**
१ वाघोली - सर्वसाधारण
२ जांभूळ - स्त्री
३ काकड पाडा - स्त्री

**इतर मागास प्रवर्ग**
१ दहिवली - स्त्री
२ निंबवली -स्त्री
३ गोवेली रेवती - स्त्री
४ चौरे - मसरूडी पुरुष
५ वसत -पुरुष
६ दहागाव - पुरुष
७ केळणी कोलम - पुरुष
८ रुंदे - पुरुष
९ वरप - स्त्री
१० म्हसकळ आणखर- पुरुष
११ उशीद आरळी - स्त्री

**खुला प्रवर्ग**

| | |
|---|---|
| पळसोली - पुरुष | मानीवली पुरुष |
| बेहेरे - पुरुष | म्हारळ - स्त्री |
| आपटी - मांजर्ली - स्त्री | नडगाव स्त्री |
| बापसई - पुरुष | नांदप - स्त्री |
| फळेगाव - पुरुष | पोई - पुरुष |
| गेरसे - स्त्री | राया - स्त्री |
| गुरवली स्त्री | रायते - स्त्री |
| घोटसई - स्त्री | रोहन अंतार्डे - पुरुष |
| कोसले - स्त्री | सांगोडे - पुरुष |
| रुंदे पुरुष | उतणे - पुरुष |
| खोणी - पुरुष | वडवली - पुरुष |
| मामनोली स्त्री | वेहळे - स्त्री |

# धसई धरणालगत परप्रांतियांचे फार्म हाउस !

## सुरक्षिततेचे काय ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

धसई धरणात भराव टाकून होतोय गिळंकृत, पाडाळे धरणाच्या मातीच्या बाधांलगतचा हजारो ब्रास गौण खनिजाचा उपसा होऊन ही कार्रवाई गुलदस्त्यात मुरबाड दि: १२ गेल्या ३५ वर्षा पुर्वी महसूलमंत्री असलेल्या कै,शाताराम भाऊ घोलपांनी बांधलेले बंधारे व त्यानंतर तालुक्यात पाणीटंचाईवर अद्याप पावेतो एकाही लोकप्रतिनिधींनी पाणीप्रश्नावर ठोस उपाय योजना केली नाही, आजही तालुक्यातील २२गावे ४५ वाड्यापाड्यावर भिषणपाणी टंचाईच्या झळा सुरू आहेत, त्यांनी बांधलेल्या बंधा-यानंतर नविनबंधारे झाले नाहितच उलट ह्या बंधा-यांची सुरक्षा यंत्रंणाच वा-यावर सोडली असल्याचे भिषणवास्तव समोर येत आहे, तालुक्यात नागरिकांची तहान भागविणा-या धरणा पैकी धसई,मानिवली या धरणाच्या भिंती लगतच्या



वनविभागाच्या व राखील भूभाग धसई धरणात तर परप्रांतियानी बंगलोफार्म उभारले आहेत तर पाडाळे साऱख्या धरणातच काही नी बोंटिगसारख्या पाण्यावर तरंगत्या कॅाटेज उभारल्या आहेत या परप्रांतियानी या जागेवर केलेले वास्तव भविष्यात या धरणा सोबत नागरिकांची देखील सुरक्षेची हमी राहिली नाही, एदाकदाचीत एखादा माथेफिरू ने या धरणावर दगा फटका केला तर धरण आणी त्याखालील गाव बेचिराख होण्यास वेळ लागणार नाही नुकताच पाडाळे या धरणाच्या बांधालगत ब्लास्ट्रीग केलेला हजारो ब्रास दगड नजिकच्या धसई धरणाच्या कालव्या लगत एका फार्महाऊस धारकाच्या रस्त्यासाठी हा दगडाचा उपसा या रस्त्यालगत पिंचिंगच्या कामाल वापर होत असल्याची बाब समोर येऊन देखील त्याची दखल घेतली गेली नाही . महसुल विभाग जलसंपदा विभाग कार्रवाईची टोलवा टोलवी ने हा प्रकार गुलदस्त्यात राहिला आहे.

तालुक्यात गेल्या चार महीन्यापासून बेकायदेशीर धंद्यांना बरकत आली असून महसुल विभागात कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसल्याने खाजगी वसुलीच्या नावाखाली गोरगरीबांना नाडले जात असतांना गर्भश्रीमंताना मात्र वेगळा न्याय दिला जात असल्याचे वास्तव सध्या दिसून येत आहे. असाच प्रकार जलसंपदा विभागाच्या पाडाळे धरणालगत घडल्याचे समोर येत आहे पुणे येथील ठेकेदार ठाण्यात येऊन त्याने महसुल विभाग व जलसंपदाविभागाला गंडवल्याची अनेक तक्रारी दाखल होऊन देखील कार्रवाई गुलदस्त्यात असून ठेकेदारे या कामावर पुणेजिल्हयातील मजूर कुटूंबे दगडपिचिंगची कामे करीत असल्याचे पाहता या ठेकेदाराचा आका कोण हा सवाल होत आहे, महसुल विभागाने पंचनामाकरण्याचा फार्स सुरू केला आणी ठेकेदाराला पाठिशी घातला

तर पाडाळे धरणाला ब्लास्टींगचा धोका व उत्तखनना बाबत. मुरबाड महसुल विभाग व जलसंपदा विभागाकडून ठोस माहिती उपलब्ध होत नसली तरी. पाडाळे धरणाची लगतच्या हजारो ब्रास दगडाचा उपसा व त्याचा वापर धसई धरणालगतच्या रस्त्यावर होत असतानाचे संबधीत विभागाने प्रत्यक्षे जागेवर जाऊन पाहणी करून कार्रवाई करावी व महसूल विभाग जलसंपदा विभागाला देखील सह आरोपी करण्याची मागणी माजी पंसं. सदश्य शाम राऊत व शेतकरी नेते गुरूनाथ पष्टे यांनी केली आहे,

### पाडाळे धरणही रामभरोसे

**धरणाच्या बांधालगत स्फोटकाने उडवले जात आहे कोकण पाटबंधारे विभागाच्या नियमानुसार धरणालगत पाचशे मिटर परीसरात किवा धरणाचे जलाशयात उतरणे,मुक्काम करणे , अतिक्रमण करणे , अवैध कामे करणे अशा नियमाचा लावलेला फलक फक्त शोभेची वस्तु असून या धरणाजवळ व धरणात अनेक फार्म हाऊसधारकांनी कब्जा केलेला असून एका फार्म हाऊसच्या मालकाने तर पाटबंधारे विभागाला हाताशी धरुन खाजगी बोटींग सुरु केली आहे . या धरणालगत राजरोस दगडाची वाहतुक करुन शासनाचा महसुल बुडवला जात असतांना , महसुल कर्मचा-यांना याचा थांगपत्ता नाही का असा सवाल निर्माण होत असून हेच कर्मचारी गोरगरीबांनी आपल्या मोडक्या घराची डागडूजी करायला रेती माती डबर आणली तर त्यावर कार्रवाई करतात मात्र बाहेरील ठेकेदारांना अभय देत असल्याचे दिसून येते**

# निर्मल इंग्लिश मीडियम शाळेचा दहावीचा निकाल ९९ टक्के

## ९०.२२ टक्के गुण मिळवत अनुष्का गुप्ता पहिली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** गोवेली जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित निर्मल इंग्लिश मीडियम गोवेली विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी - मार्च 2025 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ. 10 वी) परीक्षेत घवघवीत यश मिळवून शाळेचे नावलौकिक केले आहे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे त्यात गोवेली शाळेतील कुमारी अनुष्का कमलेश गुप्ता हिने 90.20% मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे तसेच द्वितीय क्रमांक कुमारी सायली ज्ञानेश्वर तुपे, तृतीय क्रमांक लतिकेश नितेश जाधव ,चतुर्थ संस्कृती संतोश घारे, पंचम मुग्धा गणेश कथोरे त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे सर तसेच शाळेच्या संस्थापिका स्मिता घोडविंदे मॅडम ,प्रशांत घोडविंदे सर मुख्याध्यापिका सौ. भावना कुंभार मॅडम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत



# मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचे निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

१) रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर.

२) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना 'होम स्वीट होम' अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार.

३) कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी - प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम-सँड तयार करणाऱ्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार.

४) राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार.

५) राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण - आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार.

६) राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय









# गीतासार



### अध्याय ११
### विश्वरूपदर्शनयोगः

अर्जुन उवाच मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसञ्ज्ञितम् । यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ ११-१ ॥

अर्जुन म्हणाला, माझ्यावर कृपा करण्यासाठी आपण जो अत्यंत गुप्त अध्यात्मविषयक उपदेश मला केला, त्याने माझे हे अज्ञान नाहीसे झाले. ॥ ११-१ ॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया । त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ ११-२ ॥

कारण हे कमलदलनयना, मी आपल्याकडून भूतांची उत्पत्ती आणि प्रलय विस्तारपूर्वक ऐकले आहेत. तसेच आपला अविनाशी प्रभावही ऐकला आहे. ॥ ११-२ ॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर । द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ११-३ ॥

हे परमेश्वरा, आपण आपल्याविषयी जसे सांगत आहात, ते बरोबर तसेच आहे. हे पुरुषोत्तमा, आपले ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बल, वीर्य आणि तेज यांनी युक्त ईश्वरी स्वरूप मला प्रत्यक्ष पाहाण्याची इच्छा आहे. ॥ ११-३ ॥


मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो । योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ११-४ ॥

हे प्रभो, जर मला आपले ते रूप पाहता येईल, असे आपल्याला वाटत असेल, तर हे योगेश्वरा, त्या अविनाशी स्वरूपाचे मला दर्शन घडवा. ॥ ११-४ ॥

श्रीभगवानुवाच पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः । नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ११-५ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), आता तू माझी शेकडो-हजारो नाना प्रकारची, नाना रंगांची आणि नाना आकारांची अलौकिक रूपे पाहा. ॥ ११-५ ॥

## रेसिपी
# कैरीचं लोणचं



**साहित्य :**
एक किलो कैरी ,दोन चमचे मीठ, एक चमचा हळद ,दालचिनी, लवंग, राई ,दोन वाट्या तेल ,चार चमचा तिखट, मसाला तीन चमचे ,मीठ

**कृती :**
एक किलो केरी आणा आणि स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर पुसा आणि बारीक तुकडे करून घ्या. त्यानंतर दोन चमचे मीठ आणि एक चमचा हळद कैरीच्या तुकड्यांवर लावा रात्रभर टोपलीत किंवा कापडावर ठेवा. दुसऱ्या दिवशी दालचिनी आणि लवंग भाजून घ्यायचे. राईची डाळ भाजून घ्यायची नंतर दालचिनी, लवंग, राई मिक्सरता बारीक करून घ्यायचे. दोन वाट्या तेल गरम करून घ्या वेठ घंड झाल्यावर मिस्करमध्ये बारीक घेतलेला मिश्रण आणि चार चमचा तिखट मसाला, तीन चमचे मीठ, हळद टाका. त्यानंतर बारीक करून घेतलेली कैरीचे तुकडे त्यात पाठा मिक्स करून घ्या थोडं मिश्रण हलवून घ्या. सकाळी पुन्हा मिक्स करून घ्या असे दोन ते तीन दिवस करा पाणी अजिबात घालू नका आणि मग काचेच्या बरणीत ठेवून या. तर अशाप्रकारे तुम्ही झटपट लोणचं अगदी घरच्या घरी बनवू शकता.

## मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत जाहीर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड तालुक्यातील 126 ग्रामपंचायतीचे वर्ष 2025 ते 2030 या कालावधीतील सरपंच आरक्षण सोडत दि.12/05/2025 रोजी मुरबाड तहसिलदार यांचेमार्फत आरक्षण सोडत शुध्दीपत्रक जाहीर करण्यात आले होते त्यानुसार दि.13/05/2025 रोजी सकाळी ठिक 11 वाजता एम.आय.डी.सी.हॉल मुरबाड येथे ठाणे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने सरपंच आरक्षण पदाची सोडत आज पार पडली. यामध्ये तालुक्यातील 126 ग्रामपंचायतीचा समावेश असून महिला आरक्षण,बिगर अनुसूचित क्षेत्रातील सरपंच आरक्षण सोडतीत अनु.जातीमध्ये प्रवर्ग व महिला असे 2 ग्रामपंचायती,अनु. जमाती मध्ये 4 ग्रामपंचायती,ना.मा.प्र मध्ये 19 ग्रामपंचायती,सर्वसाधारण मध्ये 46 ग्रामपंचायती तर पेसा अंतर्गत असलेल्या एकूण अनुसूचित क्षेत्रातील सरपंच महिला आरक्षणामध्ये 28 ग्रामपंचायती तसेच अनुसूचित क्षेत्रातील सर्वसाधारण सरपंच आरक्षितमध्ये 27 ग्रामपंचायतींचा समावेश जाहिर झालेल्या आरक्षण सोडत करण्यात आल्याचे जाहिर करण्यात आले आहे.सदर सोडत लहान मुलाच्या हातून काढण्यात आली आहे.यावेळी उपविभागीय अधिकारी ठाणे उर्मिला पाटील,मुरबाड तहसिलदार अभिजीत देशमुख,गटविकास अधिकारी डॉ.लता गायकवाड यांच्या समक्ष उपस्थितीत आरक्षण सोडत काढण्यात आली.यापवेळी मुरबाड तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी,ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच,सदस्य, नागरिक तसेच पत्रकार उपस्थित होते..

# मान्सून कालावधीत लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून काम करावे
## : आयुक्त सौरभ राव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात मान्सूनपूर्व कामे जलदगतीने सुरू असून सर्व कामे 31 मे पूर्वी पूर्ण होण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व कामांवर प्रशासनाचे बारीक लक्ष आहे असे नमूद करीत पावसाळयामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी महापालिका यंत्रणा संपूर्णपणे सज्ज असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत नमूद केले. तसेच सद्यस्थितीत जी कामे सुरू आहेत त्याबाबत लोकप्रतिनिधींच्या सूचना घेवून तशा पध्दतीने कामे करावीत तसेच मान्सून कालावधीत लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून असेही निर्देश त्यांनी सर्व उपायुक्त व सहायक आयुक्त यांना दिले.

खासदार नरेश म्हस्के यांनी मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी माजी नगरसेवक व महापालिका प्रशासन यांच्यासमवेत महापालिकेतील नरेंद्र बल्लाळ सभागृहात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (2) संदीप माळवी, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मनिष जोशी, शंकर पाटोळे यांच्यासह सर्व प्रभागसमितीचे सहाय्यक आयुक्त व महापालिकेतील माजी नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीच्या सुरूवातीला उपायुक्त गजानन गोदेपुरे यांनी महापालिकेच्या माध्यमातून मान्सूनपूर्व करण्यात आलेल्या कामाची माहिती सादर केली. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिंधीनी आपापल्या विभागात नागरिकांना भेडसावत असलेल्या कामांबाबतच्या समस्या मांडल्या. यावेळी प्रशासनाच्यावतीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी समस्यांचे निराकरण तातडीने करावेत असे असे नमूद केले.महापालिका कार्यक्षेत्रामध्ये महापालिकेबरोबर इतरही प्राधिकरणांचा समावेश आहे. मान्सूनपूर्व कामे शहरात सुरू असून सर्व कामे येत्या 30 मे पर्यत पूर्ण करण्याचे निर्देश सर्व प्राधिकरणांना दिले असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. सर्व प्रभागसमितीनिहाय नालेसफाईचे काम युदधपातळीवर सुरू आहे, परंतु मध्यंतरी झालेल्या पावसामुळे डोंगराहून वाहून आलेला गाळ नाल्यात आल्याने पुन्हा नालेसफाई केली जाणार असल्याचे आयुक्तांनी नमूद केले, यावेळी त्या त्या विभागातील स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून काम करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नालेसफाईबरोबरच अंतर्गत गटारे, रस्त्याच्या दुतर्फा असलेली गटारे देखील साफ केली जातील. तसेच पावसाळयात रस्त्यावर कोणत्याही प्रकारे खड्डे पडणार नाही याबाबतची दक्षता घेतली असून जर खड्डा पडता तर तो तात्काळ अत्याधुनिक पध्दतीने बुजविला जाईल असेही त्यांनी सांगितले. सदर बैठकीत वृक्ष छाटणीबाबतही लोकप्रतिनिधींनी चर्चा केली असता, प्रशासनाने यंदा एप्रिलपासूनच शहरातील झाडांची छाटणी सुरू केलेली आहे. परंतु ज्या ठिकाणी अद्याप वृक्षछाटणीची कामे बाकी आहे, ती देखील 30 मे पूर्वी पूर्ण केली जातील असे आयुक्तांनी नमूद केले. तसेच वृक्ष छाटणीनंतर जमा झालेल्या हरित कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सूचना यावेळी संबंधित विभागाला दिल्या.महापालिका कार्यक्षेत्रात एमएमआरडीए, एमएमआरडीसी, मेट्रो प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी प्राधिकरणांच्या अखत्यारितील देखील कामे सुरू आहेत. सदर कामे 30 मे पूर्वी पुर्ण करण्याच्या सूचना देखील त्यांना देण्यात आलेल्या आहे. परंतु पावसाळ्यात संबंधित प्राधिकरणाच्या अखत्यारित येणाऱ्या कोणत्याही रस्त्यावर खड्डा पडल्यास ते काम नागरिकांच्या सोईसाठी महापालिका करेल असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. आज स्थानिक लोकप्रतिनिधीसमवेत झालेल्या बैठकीत नालेसफाई, अंतर्गत गटारांची साफसफाई, वृक्षछाटणी, रस्ते दुरूस्ती, सखल भागात साचणारे पाणी, आरोग्य आदीबाबतच्या ज्या सूचना करण्यात आलेल्या आहे, त्याची प्रशासनाने नोंद घेतली असून याबाबत आवश्यक ती कार्यवाही पावसाळ्यापूर्वी करण्यात येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी या बैठकीत नमूद केले.

पावसाळ्यापूर्वी खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने आयुक्त सौरभ राव यांनी बैठक आयोजित करुन विविध विभागातील समस्या जाणून घेतल्या याबाबत लोकप्रतिनिधींनी आयुक्तांचे आभार व्यक्त केले.

**अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिल्या सक्त सूचना**

पावसाळयामध्ये आपत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व विभागांनी संगनमताने काम करावयाचे आहे, कोणत्याही विभागाची तक्रार प्राप्त झाल्यास ती जबाबदारी एकमेकांवर न ढकलता नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिले.

Department Of Public Relations,Thane Municipal Corporation, Thane
Off. Contact No. 022-25364779
Official Website - www.thanecity.gov.in
E-mail - publicrelationtmc@gmail.com
Twitter - @TMCaTweetAway
Instagram - @smartcity_thane
आपत्ती व्यवस्थापन कक्ष - 1800-222-108/8657887101

### दक्षिण आशियाई ट्रायथलॉन स्पर्धेत
# डॉली पाटीलची सुवर्ण कामगिरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बी. के. बिर्ला नाईट कॉलेज, कल्याणच्या वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षातील विद्यार्थिनी डॉली पाटील हिने नेपाळ येथे दिनांक २५ व २६ एप्रिल २०२५ रोजी पार पडलेल्या दक्षिण आशियाई ट्रायथलॉन स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावले आहे. या शानदार कामगिरीनंतर डॉलीची जपान येथे २०२६ मध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

उल्लेखनीय म्हणजे, या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दक्षिण आशियाई देशांतील नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता. डॉली हिने आपल्या उत्तम फिटनेस, तांत्रिक कौशल्य आणि मानसिक खंबीरतेच्या जोरावर स्पर्धेत आघाडी घेत भारतासाठी हे मानाचे पदक मिळवले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बिपीनचंद्र वाडेकर यांनी डॉलीचे मनःपूर्वक अभिनंदन करत, "अशा आंतरराष्ट्रीय यशामुळे संपूर्ण महाविद्यालयाचा अभिमान वाढत असल्याचे सांगत तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. डॉलीच्या या विजयाचे श्रेय तिच्या सातत्यपूर्ण सरावाला, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाला, व महाविद्यालयाने निर्माण केलेल्या प्रोत्साहनात्मक वातावरणाला दिले जात आहे. बी. के. बिर्ला नाईट कॉलेजने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले असून, डॉलीसारख्या विद्यार्थिनींच्या प्रेरणादायी यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही नवे उद्दिष्ट साध्य करण्याची उमेद मिळते.

# पडघ्यातील तीन शाळांचा शंभर टक्के निकाल
## अव्वल स्थानावर मुलींची बाजी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत व इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील तिन शांळाचा दहावी निकाल शंभर टक्के लागला असून गुंणवत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

टी. ए. पाटील इंग्लिश मिडीयम स्कुलचा १०० टक्के निकाल लागला असुन निधी शुक्ला या विद्यार्थीनेने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम, मोईजीन शेख ह्याने ९२.८० टक्के गुण मिळवून व्दितीय, पार्थ संगारे ह्याने ९०.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला तर बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज या शाळेचा सुध्दा १०० टक्के निकाल लागला असुन रूचीता वेलेकर हीने ८९.४० टक्के गुण मिळवून प्रथम, हर्ष पाटील ह्याने ८९ टक्के गुण मिळवून द्वितीय, साहील भोईर ह्याने ८८.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. तसेच आर. के. पालवी विद्यामंदिर



अँण्ड ज्युनियर कॉलेज ह्या शाळेचा सुध्दा १०० टक्के निकाल लागला असुन श्लोक दळवी ह्याने ९३.८० टक्के गुण मिळवून प्रथम, भावीक शेंडे ह्याने ९२.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, गौरव फर्डे ह्याने ९२.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या आदर्श विद्यालय कुंरूद या शाळेचा निकाल ९६ टक्के लागला असून निसर्गा भोईर ह्या विद्यार्थीनेने ९१ टक्के गुण मिळवून प्रथम, प्रिया पाटील हीने ८९.६० टक्के गुण मिळवून द्वितीय, हर्षीता घरत हीने ८५.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. टी. ए. पाटील शाळेचे उपाध्यक्ष शंशाक तांबोळी मुख्याध्यापक रामचंद्र थोरात, बी. बी. पाटील शाळेचे संस्थापक बाळाराम पाटील, मुख्याध्यापिका मोनीका मराडे, अनामिका पाटील, आर के.पालवी शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पालवी, कुरूंद शाळेचे मुख्याध्यापक संतोष शेलार यांनी सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ठाणे जिल्ह्यात दहावीच्या निकालात मुलींचं भरघोस यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वीच्या परीक्षेचा निकाल आज, दि. १३ मे, २०२५ रोजी जाहीर झाला आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९५.५७% इतका लागला असून, एकूण १ लाख १३ हजार ६५८ विद्यार्थ्यांपैकी १ लाख ०८ हजार ३११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात



मुलींचा निकाल ९६.६९% तर मुले ९४.५०% उत्तीर्ण झाले असून, मुलींची सरासरी कामगिरी मुलांपेक्षा जास्त आहे.

**मुलींची बाजी:**

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी मुलींची टक्केवारी मुलांपेक्षा अधिक असून हा एक सकारात्मक बदल आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी सांगितले की, "यंदा ठाणे जिल्ह्यात मुलींनी यश मिळवून आपली शैक्षणिक प्रगती सिद्ध केली आहे. ही घोडदौड निश्चितच प्रेरणादायक आहे."

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे केले अभिनंदन:**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करताना म्हटले की, "विद्यार्थ्यांनी सातत्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. शिक्षण क्षेत्रातील प्रगतीसाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे."

# त्रिरत्न, आर्यसत्ये व पंचशील तत्वे यांचा अंगीकार म्हणजे राष्ट्रविकास – सुनील म्हसकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी आदर्श तरुण मित्र मंडळ सवादे (मुंबई) आणि पंचशील मित्र मंडळ सवादे, ता.कराड, जि.सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे सवादे येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या संयुक्त जयंतीचा उत्सव संपन्न झाला.




याप्रसंगी सुप्रसिद्ध व्याख्याते आणि साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर व प्रसिद्ध कराओके गायक महादेव कोचरेकर हे विशेष निमंत्रित अतिथी म्हणून उपस्थित होते. तर मंडळाचे प्रेरणास्थान व सल्लागार सुरेश सागरे, मंडळाचे अध्यक्ष संजय पोपट सागरे, माजी शिक्षणाधिकारी संपतराव सवादकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुप्रसिद्ध व्याख्याते आणि साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर यांनी 'युगपुरुष भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण ही आजच्या काळाची गरज' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हटले की, "आज जगात शांतता हवी असेल तर भगवान गौतम बुद्धांनी दिलेला दया, क्षमा व शांततेचा उपदेश सर्वांनी पाळणे, ही काळाची गरज आहे. जगाला युद्ध नको तर बुद्ध हवा आहे. भगवान बुद्धांनी आणि डॉ.आंबेडकरांनी दिलेली शिकवण आज आपण प्रत्यक्ष कृतीत आणली पाहिजे. मानवी मूल्ये व संविधानिक मूल्ये यांचा अंगीकार केला पाहिजे. आपण बौद्धिकता व नैतिकतेचा विकास करून, सत्याची कास धरून, समता, बंधुता व एकता आदी वैश्विक मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे. समाजसेवेच्या भावनेचा विकास करून, आपल्या प्रत्येक सुयोग्य कृतीत आनंद व समाधान मानून तसेच एकाग्रता आणि मनाची शुद्धी हे पैलू विकसित करून मोक्षाकडे वाटचाल केली पाहिजे. प्रज्ञा, शील व करुणा या तीन तत्वांबरोबरच त्रिरत्न, आर्यसत्ये व पंचशील तत्वे यांचा जाणतेपणाने अंगीकार केल्यास आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास तर होईलच परंतु त्यातून समाजाचा आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास झाल्याखेरीज राहणार नाही..."

सदर कार्यक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष दिलीप सागरे, सचिव गौतम सागरे, खजिनदार संजय कृष्णाजी सागरे,विनोद कांबळे, सौ.प्रफुल्ला बाबासाहेब कांबळे,प्रणाली कांबळे,रुपाली प्रशांत कांबळे आदी ग्रामस्थ व अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रसिद्ध कराओके गायक महादेव कोचरेकर यांनी भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित विविध गीते सुमधुर व मंजुळ सुरात सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी लहान मुलांसाठी संगीत खुर्चीचा खेळ घेण्यात आला. तर कुमारी प्रांजल बाबासाहेब कांबळे,प्रणवी प्रशांत कांबळे,श्वेता प्रदीप सागरे,ऐश्वर्या व अंतरा कांबळे,अक्षरा वीर,श्वेता सागरे,साहिल दंडवते आदींनी सुंदर नृत्ये सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. मंडळाच्या वतीने उत्कृष्ट नृत्य सादर करणाऱ्या तसेच विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य संपादन करणाऱ्या स्पर्धकांचे पुस्तक रूपाने बक्षिसे देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी मान्यवरांचा परिचय व त्यांचे स्वागत सुरेश सागरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय सागरे यांनी केले. संपतराव सवादकर व डॉ. प्रशांत कांबळे यांनी उत्तम भाषणे सादर केली. माजी मुख्याध्यापिका सुशीला सवादकर यांनी सुंदर मनोगत व्यक्त केले. आयु.प्रशांत सुरेश सागरे यांनी उपस्थितांना भोजनाचा तर राजेंद्र सागरे यांनी मिष्ठांनाचा लाभ देऊ केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ.प्रशांत कांबळे यांनी केले तर मंडळाचे अध्यक्ष संजय सागरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुरबाडमध्ये इयत्ता दहावीचे २६८५ विद्यार्थी उत्तीर्ण
## तालुक्याचा निकाल ९३.१३ टक्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : मुरबाड तालुक्यात इयत्ता दहावीच्या परीक्षेला २८८३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये १५०५ विद्यार्थी, १३७८ विद्यार्थिनी परीक्षा दिली होती.



१३ मे२०२५ रोजी इयत्ता दहावीचा निकाल दुपारी एक वाजता जाहीर झाला त्यामध्ये मुरबाड तालुक्यातचा ९३.१३ टक्के निकाल लागला आहे. त्यामध्ये विद्यार्थीचा ९१.४९ टक्के निकाल लागला आहे.तर विद्यार्थिनीचा ९४.९२ टक्के लागला त्यामध्ये १३७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर १३०८ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व इयत्ता दहावीच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.







## सुमतीबाई देव विद्यालयाचा सलग १४ वर्षे १०० टक्के निकाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव माध्यमिक विद्यालयाने उज्वल यश संपादन केले आहे. सलग १४ वर्ष१०० टक्के निकालाची परंपरा या वर्षीही विद्यालयाने कायम राखली आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या स्पृहणीय यशाबद्दल पेण शिक्षण महिला समितीच्या अध्यक्षा सौ. सुहासिनी देव संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी पालक यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यालयाचा निकाल १००टक्के लागला असून एकूण परीक्षेत ७३ विद्यार्थी बसले होते यामध्ये डिस्टिंक्शन मध्ये ४० फर्स्ट क्लासमध्ये २४ सेकंड क्लासमध्ये ९ विद्यार्थ्यांना मिळालेले असल्याने या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक प्रशांत संजय हंडाळ४८४/५००(९८.२०) टक्के द्वितीय क्रमांक कु. मयुरी परशुराम कोठेकर (४८२/५००)९७.८०टक्के तृतीय क्रमांक कु.आर्या शरद जांभळे (४७७ /५००) ९५.४०टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

## तानसा अभयारण्य वनपरिक्षेत्र वैतरणामध्ये राबविला निसर्ग अनुभव

### प्राणी गणनेला बसला ढगाळ वातावरणाचा फटका

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : बुद्ध पौर्णिमेला संपूर्ण वैतरणा परिक्षेत्रामध्ये आठ ठिकाणी निसर्गानुभव कार्यक्रम राबविण्यात आला.सदर कार्यक्रमात ठाणे वन्य विभागाचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये व सहाय्यक वनसंरक्षक दत्तात्रय मिसाळ यांच्या मार्गदर्शनाने प्रकाश चौधरी वनपरिक्षेत्र आधिकारी वैतरणा वन्यजीव यांनी निसर्गाचा कार्यक्रम राबविला वनपरिक्षेत्र वैतरणामध्ये पेंढरी, क्वारीपाडा, निषेद तासु नाला,मोज,दाढरा परळी, तिळमाळ,घोडसाखर या ठिकाणी निसर्ग अनुभवाचा कार्यक्रम राबविला यावेळी नैसर्गिक पानवठ्याच्या ठिकाणी उंच झाडावर लाकडांच्या सहाय्याने मचान बनवून त्या ठिकाणी २४ तासासाठी वन विभागातील स्टाफ व निसर्गप्रेमी हे सदर मचान वर बसून सदर पानवठ्यावर किती प्राणी पक्षी पाणी पिण्यासाठी आले त्याची नोंद केली जाते. त्यावरून सदर ठिकाणी किती वन संपत्ती आहे याचं नोंद होते.तसेच सदर ठिकाणी यावर्षी ट्रॅप कॅमेरे सुद्धा लावण्यात आले होते. यावर्षी वेगवेगळया पानवठ्यावर रात्रीच्या वेळी तरस, रानडुक्कर, चौशिंगा, उदमांजर, ससा हे प्राणी दिसून आले तसेच मोर,वनपिंगळा , किंगफिशर,राखी धनेश आणि इतर पक्षी दिसून आल्याने त्यांची नोंदी घेण्यात आली. सदर निसर्ग अनुभव कार्यक्रमासाठी वन्यप्रेमी दिनेश वाघे व अविनाश रोकडे, विनोद धलपे व इतर वन्य प्रेमींनी निसर्ग अनुभव केला या निसर्ग अनुभव मध्ये वनपरिक्षेत्र वैतरणा मधील सर्व वनपाल श्री.माळी,श्री. म्हात्रे,श्री. कदम,श्री. नाईक आणि वनरक्षक व सर्व वनमजूर यांनी चोख भूमिका पार पाडली.





**८ हजार ३०० हेक्टर क्षेत्र असलेल्या तानसा - वैतरणा प्राणीगणनेसाठी चाळीसपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.तसेच २० कृत्रीम पाणवठ्यासह ६ नैसर्गिक पाणवठ्याजवळ सहा मनोरे व झाडांना मचाण बांधून प्राणी निरीक्षणाची सोय करण्यात आली होती. यावेळी अवकाळी पावसाचा अडसर आला.**
**- प्रकाश चौधरी, वन्यजीव वनपरीक्षेत्र अधिकारी, तानसा - वैतरणा.**


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र.१५/२०२५-२६**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील ९ कामांसाठी योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन बी-१ नमुन्यात मोहरबंद लिफाफामध्ये जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि.१४/०५/२०२५ ते २१/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत रोखीने विकत मिळतील.

परिपूर्ण भरलेल्या निविदा, सीलबंद केलेल्या पेटीमध्ये दि. २१/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत टाकण्यात याव्यात. मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व निविदा दि.२२/०५/२०२५ दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. सदर कामाची बयाणा रक्कम आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या नावाने रोख/डिमांड ड्रॉफ्टद्वारे भरावयाची आहे.

कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्यांचा अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

**सही /-**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा. क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/१२६**
**१३/०५/२०२५**


## एस एससी परीक्षेत हिमांशू कांबळे याचे यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नुकत्याच झालेल्या एस एससीच्या परीक्षेत कल्याण तालुक्यातील पत्रकार संजय कांबळे यांचा मुलगा कु हिंमाशू संजय कांबळे याने जवळपास८०टक्के गुण मिळवून उज्वल यश मिळवले असून इतर विद्यार्थी देखील ८०टक्के च्या वर मार्क घेऊन या परिक्षेत चमकले आहेत, या सर्वाचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांसह अनेक वरीष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रमंडळीनी यांचे अभिनंदन केले आहे.

ठाणे जिल्ह्यातून यंदा २० वीच्या परीक्षेसाठी सुमारे १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परीक्षेत बसले होते, तर राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, व लातूर आदी ९ विभागातून १५ लाख ४६ हजार, ५८९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी १४ लक्ष, ५५ हजार, ४३७ इतके विद्यार्थी उत्तीर्ण झाले, यंदा कॉंपीमुक्त अभिमान राबविण्यात आले होते. पत्रकार संजय कांबळे यांचा मुलगा कु हिंमाशू कांबळे हा म्हारळ येथील प्रिती अँकेडमी व ज्युनिअर कॉलेज मध्ये शिक्षण घेत होता, याच शाळेतील कु नूपूर माळी, विद्यार्थ्यांनी ८४टक्के गुण मिळवून उज्वल यश प्राप्त केले आहे,

तर ग्रामीण भागातील रायते विभाग हायस्कूल मधून मांजर्ली गावची कु अस्मिता विलास घारे(८८टक्के)गुण मिळवून पहिली आली आहे. याशिवाय कु दिव्या संजय घारे, आपटीची कु कनिका शंशिकांत शिसवे, वरप गावची कु संस्कृती कुर्ले आदी मुली, मुलांनी या परीक्षेत उज्वल यश मिळवले आहे,

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे ,कार्यसम्राट आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, यांनी कु हिंमाशू कांबळे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच अतिरिक्त आयुक्त श्री नेमाने, प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिसोदे मँडम, प्रसिद्ध उद्योजक मोहनशेठ(बाबा) कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, शहापूरचे राकेश पाटील, यांच्या सह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, नातेवाईक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे



## खर्डी उपजिल्हा रुग्णालयात सुविधा उपलब्ध करा - मनसेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : शहापुर तालुक्यातील मुंबई-आग्रा महामार्गानजीक असलेल्या खर्डी उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी मशीन पडून असून तज्ञ मिळत नसल्याने वापर होत नसल्याने येथे सोनोग्राफी सुरू करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची व इतर कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून येथे येणाऱ्या गोरगरिबांना आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी व ह्या रुग्णालयाच्या नवीन इमारतीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यात यावे अशी मागणी मनसेचे खर्डी शहराध्यक्ष सगीर शेख यांनी ठाण्याचे शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार हे खर्डी रुग्णालयाला भेट द्यायला आले होते त्यावेळी भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

खर्डी उपजिल्हा रुग्णालयात 47 कर्मचाऱ्यांची गरज असताना येथे फक्त 18 कर्मचारी उपलब्ध आहेत. ह्या रुग्णालयात रोज 200 ते 250 रुग्णाची तपासणी करण्यात येते पण कर्मचारी कमी असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असल्याने येथे तात्काळ मंजूर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी मनसेने केली असून येथे पाणीपुरवठा कमी प्रमाणात असल्याने पाण्याची कायमची सोय करण्यात यावी व रुग्णांची गैरसोय होणार याबाबत आरोग्य विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी यावेळी मनसेचे खर्डी शहराध्यक्ष सगीर शेख यांनी केली आहे. यावेळीखर्डी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.आशिलाक शिंदे, मनसेचे शहराध्यक्ष सगीर शेख, संजय वाढविंदे,महिला आघाडीच्या रुक्मिणी वाडेकर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.



## ध्रुव हेमंत जोशी ह्याला दहावी परिक्षेत ८०%

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवलीच्या ओमकार इंटरनॅशनल शाळेत ध्रुव हेमंत जोशी शिकत होता. डोंबिवलीचे हेमंत जोशी ह्यांचे २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम, जम्मू काश्मीर येथील अतिरेकी हल्ल्यात दुर्दैवी मृत्यु झाला होता. अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यावेळी ध्रुव हा सुद्धा तेथे होता, हल्ल्या नंतर त्याने आणि त्याच्या मावस भावाने हर्षल संजय लेले ह्यांनी मिळून त्याच्या मावशीला म्हणजेच हर्षल ची आई व संजय ची पत्नी कविता लेले ह्यांना उचलून खाली आणले होते, ह्या अतिरेकी हल्ल्यात डोंबिवलीच्या तीन जवळच्या नातेवाईकांचा मृत्यू झाला ते लेले मोने आणि जोशी हे एकत्र सहकुटुंब काश्मीर सहलीसाठी एकत्र गेले होते.



## अपंगत्वावर मात करून चिन्मयी रहाणेची यशस्वी घोडदौड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : बारावीच्या निकालानंतर आज अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर दहावीच्या शालांत परीक्षा 2025 चे निकाल जाहीर झाले. यामध्ये पालघर जिल्हा विक्रमगड तालुक्यातील भोपोली गावातील श्रीमती कमलाबाई जयंतीलाल जोगानी हायस्कूलची आदिवासी समाजातील विद्यार्थिनी कु. चिन्मयी विनोद रहाणे हिने आपल्या अपंगत्वावर मात करून शालांत परीक्षेमध्ये एकूण 89.80% गुण मिळवून यशस्वी घोडदौड केली आहे. चिन्मयने तिच्या वर्गातील मार्गदर्शक वर्गशिक्षक, आई वैष्णवी रहाणे (माजी सदस्य पालघर जिल्हा परिषद) व वडील विनोद रहाणे यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे तिला एक अभ्यासाची दिशा दिल्याने व तिच्याकडून अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यासाची तयार करून घेतल्यानेच तिने हे घवघवीत यश संपादन केले आहे. चिन्मयीला वाचनाचे प्रचंड आवड असून,तिने प्रशासन सेवेत तहसीलदार म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे तिने मिळवलेल्या यशाबद्दल समाजातील सर्व स्तरावर तिचे कौतुक होत असून तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## प्राणी गणनेसाठी वनविभाग सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : वन विभागाच्या वतीने वैशाख पोर्णिमेला वन्यप्राण्यांची गणना केली जाते. या गणनेसाठी शहापूर वन विभाग सज्ज झाला आहे. तालुक्यातील अभयारण्यासह वनविभागाच्या विविध भागात ही प्राणी गणना केली जाणार आहे. वनविभागाच्या वतीने दरवर्षी वैशाख पोर्णिमेला वन्यप्राण्यांची गणना केली जाते.त्यानुषंगाने तानसा-वैतरणा,शहापूर वानपरीक्षेत्र व धसई वानपरीक्षेत्र हद्दीत वन विभागाने मचान तयार करुन ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत.

प्रमुख पाणवठ्याच्या ठिकाणी वन विभागाच्या वतीने उंच ठिकाणी झाडांच्या बांध्यावर किंवा टेकडीवर झाडांच्या फांद्यांच्या सहाय्याने अडोसा निर्माण केला जातो. त्यामध्ये वन विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच काही पर्यावरण मित्र स्वयंसेवक म्हणून थांबतात. वैशाख पोर्णिमेला दिवसा आणि रात्री किती वन्यप्राणी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी वेगवेगळ्या वर्गवारीतील किती प्राणी आले त्यांची गणना केली जाते.तथापि मागीलवर्षी मचाणावरून वन्य प्राण्यांचे निरीक्षण केले असता त्यात ८ प्रकारचे सस्थन प्राणी दिसून आले.यामध्ये भेकर, रानडुक्कर, उदमांजराच्या दोन प्रजाती, मुंगूस, ससा, तरस आणि संकटग्रस्त असा चौशिंगा दिसून आल्याची नोंद आहे.दरम्यान अवकाळी पाऊस सोबतच ढगाळ वातावरण यामुळे पौर्णिमेच्या चंद्र प्रकाशात होणारी प्राणी गणनेवर विरजन पडण्याची शक्यता नाकरता येत नाही. तरीही शहापूर उपवनसंरक्षण विभाग प्राणी गणणेसाठी पूर्ण तयारीणीशी असल्याची माहिती धसई वनपरीक्षेत्र अधिकारी दर्शन ठाकुर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.



**प्राणी गणनेसाठी बुद्ध पौर्णिमेची वेळ योग्य असते. या दिवसात वातावरणात वन्यप्राणी किमान एकदा तरी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी येतात.चंद्राचा लख्ख प्रकाश पडलेला असतो. त्यामुळे या दिवशी प्राणीगणना अचकू होते.**
**- शैलेश गोसावी, वनपरीक्षेत्र अधिकारी,शहापूर.**

**८ हजार ३०० हेक्टर क्षेत्र असलेल्या तानसा - वैतरणा प्राणीगणनेसाठी चाळीपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच २० कृत्रीम पाणवठ्यासह ६ नैसर्गिक पाणवठ्याजवळ सहा मनोरे व झाडांना मचाण बांधून प्राणी निरीक्षणाची सोय करण्यात आली आहे.**
**- प्रकाश चौधरी, वन्यजीव वनपरीक्षेत्र अधिकारी, तानसा - वैतरणा.**

## कन्व्हेअन्स डीडच्या नावाखाली सोसायटी पदाधिकाऱ्यांची लाखोंची फसवणूक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ डोंबिवली - डोंबिवली पूर्वेतील टंडन रस्ता भागातील एका सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना तुमचा सरकारी जमिनीवरील सात बारा उतारा तुमच्या सोसायटीच्या नावे करून देतो. या बदल्यात शासन शुल्क वगळून इतर खर्चासाठी सोसायटीतील एकूण १५ सदस्यांच्या माध्यमातून एका मध्यस्थाने (एजंट) सोसायटी पदाधिकाऱ्यांकडून मागील तीन वर्षात २८ लाख ९३ हजार रूपये वसूल केले. त्यानंतर सोसायटी चालकांना बनावट सात बारा उत्तारा आणि महसूल विभागाची काही कागदपत्रे सादर करून सोसायटी पदाधिकाऱ्यांची एकूण २४ लाख ९३ हजार रूपयांची फसवणूक केली आहे. मध्यस्थाने घेतलेल्या एकूण २८ लाख ९३ हजार रूपयांच्या रकमेपैकी मध्यस्थाने सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या तगाद्यानंतर चार लाख रुपये सोसायटीला परत केले, उर्वरित रक्कम अनेक वेळा मागणी करूनही मध्यस्थाने परत न केल्याने मध्यस्थाने आपली फसवणूक केली म्हणून सोसायटी पदाधिकाऱ्याच्या तक्रारीवरून रामनगर पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

डोंबिवली पूर्वेतील टंडन रस्त्यावरील ओम चिदानंद सोसायटीच्या अध्यक्षा आरती सडेकर यांनी कन्व्हेअन्स डीडवे काम करून देणारा मध्यस्थ वैभव वामन गावाले (रा. कल्याण) यांच्या विरुध्द तक्रार केली आहे. वैभव गावाले यांनी यापूर्वी डोंबिवलीतील ओम समर्थ कृपा सोसायटी पदाधिकाऱ्यांची अशाच प्रकारे फसवणूक केली होती. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल आहे, असे तक्रारदार सडेकर यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे.

सोसायटी अध्यक्षा सडेकर यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही राहत असलेली ओम चिदानंद सोसायटी १९९४ मध्ये बांधण्यात आली. ही इमारत सरकारी जमिनीवर उभी आहे. शासन आदेशाप्रमाणे अशा जमिनी भोगवटादार २ मधून भोगवटादार १ म्हणजे सोसायटीच्या नावे होणार आहेत.




सरकारी जमिनीचा सोसायटीच्या नावे सातबारा उतारा करण्यासाठी सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या सहमतीने मध्यारथ म्हणून वैभव गावाले यांना नियुक्त करण्यात आले. शासन शुल्क वगळून वैभव यांना एकूण १५ लाख रुपये देण्याचे ठरले, वैभव आणि सोसायटी यांच्यात यासंदर्भात सामंजस्य करार झाला सोसायटीतील प्रत्येक सदस्याने सदनिकेच्या चौरस फुटाप्रमाणे पैसे देण्याचे ठरले. अशी एकूण २८ लाख ९३ हजार ७०० रूपयांची रक्कम सोसायटी बँक खात्यात जमा झाली. ही रक्कम कन्व्हेअन्स हीडच्या कामासाठी वैभव गावाले यांना देण्यात आली. हे पैसे स्वीकारताना वैभव यांनी सोसायटीला ओम चिदानंद सोसायटीचा सात बारा उतारा आणि महसूल विभागाची काही कागदपत्रे दिली. ही कागदपत्रे बनावट असल्याचे नंतर सदस्यांचा निदर्शनास आले.

सोसायटी पदाधिकाऱ्यांनी यासंदर्भात विचारणा केल्यावर त्यांनी पैसे परत करण्याचे आश्वासन दिले. तीन धनादेश सोसायटीला दिले. ते बँकेत वटले नाहीत. सततच्या मागणीनंतर चार लाख रुपये परत केले, उर्वरित २४ लाख ९३ हजाराची रक्कम परत करण्यासाठी कोणतीही हालचाल वैभव गावाले यांच्याकडून होत नसल्याने, त्यांनी बनावट सात बारा उतारा देऊन सोसायटी पदाधिकाऱ्यांची फसवणूक केल्याने सोसायटी पदाधिका-यांनी त्यांच्या विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. रामनगर पोलस याप्रकरणाचा तपास करत आहेत.




## शहापूर तालुक्याचा १० वीचा निकाल ९६.७५ %

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला आहे.यंदा शहापूर तालुक्याचा दहावीचा निकाल ९६.७५ टक्के लागला असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून संपूर्ण शहापूर तालुक्याचा निकाल हा ९६. ७५ टक्के इतका लागल्याचे पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे सांगण्यात आले आहे. दहावीच्या परीक्षेसाठी तालुक्यातून ५ हजार ३३१ विद्यार्थ्यांनी आवेदन पत्र भरले होते. पैकी ५ हजार ३०७ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट असून यापैकी ५ हजार १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शहापूर तालुक्याचा निकाल ९६.७५ टक्के लागला असल्याची माहिती गटाशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण यांनी दिली.




# लग्न समारंभावर अवकाळी पावसाचे विघ्न!

## लाखोचे मंडप पावसात भिजल्याने मंडप व्यवसायिक संकटात!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : लग्न हा भारतीय संस्कृतीत मानवी जिवनातील एक महत्वाचा संस्कार मानला जातो.मुलगा व मुलगी उपवर झाल्यावर विवाह बंधनात अडकून आपल्या नव्या आयुष्याला सुरूवात करत असतात.आणि म्हणून आपल्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न थाटा माटात व्हावे अशी प्रत्येक आई - वडिलांची इच्छा असते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्चही केला जातो. हा लग्न समारंभ शहरात किंवा ग्रामीण भागात शक्यतो उन्हाळ्यात एप्रिल मे महिन्यात ठेवले जातात. मे महिन्यात शाळांना सुट्टया असतात .शिवाय रिकामे दिवस असल्याने बहूतांशी लोक या महिन्यात लग्नाच्या मुहूर्ताला पसंती देतात.

परंतु या वर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच निसर्गराजा कोपला असून संपूर्ण मुरबाड तालुक्यात 6 तारखेपासून वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली असल्याने वधू -वरांसह ,वऱ्हाडी मंडळींच्या आनंदावर विरजन पडले आहे. अजूनही ग्रामीण भागात तीन दिवसाचा हा समारंभ चालत असून उटणी, हळदी व लग्न समारंभ असे विधीचे कार्यक्रम होत असतात. त्यासाठी लाखोचे मंडप डेकोरेशन, डिजे, खंमग जेवणावळीचे नियोजन होत असते.



**यावर्षी पावसाने लवकरच सुरुवात केली असल्याने अनेक मंडप व्यवसायिकांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले असल्याने ते हवालदिल झाले आहेत.शासनाने मंडप -डेकोरेशन व्यवसायिकांना नुकसान भरपाई देऊन दिलासा द्यावा.**
**- विजय भोईर , सोनावळे मंडप व्यवसायिक**

परंतु यावर्षी गेले सहा ते सात दिवस सतत अवकाळी पाऊस कोसळत असल्याने तसेच विज गायब झाल्याने अनेक ठिकाणी हळदीचा प्रोग्राम नाईलाजाने रद्द करावा लागला असल्याने हळदी शौकिनांचा मोठा हिरमोड झाला आहे. ग्रामीण भागात लग्नासाठी सभागृह उपलब्ध नसल्याने कापडी मंडप उभारले जातात. मात्र यावर्षी सततच्या अवकाळी पावसाने हे महागडे कापडी मंडप भिजून गेल्याने व वादळाने फाटून गेल्याने मंडप व्यवसाईकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यासाठी शासनाने या मंडप व्यवसाईकांना मदत करावी अशी मागणी समोर येत आहे.

### तळा येथे अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली

## गौतम बुद्ध जयंती उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : जगाला शांतीचा व दुःख मुक्तीचा सन्मार्ग बहाल करणारे महान जागतिक मनो वैज्ञानिक तथागत गौतम बुद्ध यांचा २५८८ वा जयंती महोत्सव दि.१२ मे २०२५ रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने मु.तळा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा संपर्क कार्यालय या ठिकाणी बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा अध्यक्ष अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षते खाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सुत्रपठण संस्कार उपाध्यक्ष नरेश मोरे यांनी केले. तथागत बुद्ध यांच्या जीवन चरित्रावर भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा महिला अध्यक्षा सुषमा शिंदे यांनी सुंदर असे गायन केले, तद्नंतर सुधीर शिंदे, बौध्दजन पंचायत समिती कोषाध्यक्ष पांडुरंग गवाणे, भारतीय बौद्ध महासभा तळा तालुका अध्यक्ष रामदास शिंदे, मधुकर नाक्ते, सुमन सकपाळ यांनी बुद्ध जयंती व बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या, याप्रसंगी संघटक सुरेंद्र शेलार व धम्म प्रचारक वसंत कासारे यांनी प्रमुख व सुंदर असे मार्गदर्शन केले.

या जयंती निमित्ताने तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा सरचिटणीस गणपत जगताप, तरूण कार्यकर्ते यश जसवलकर तसेच प्रकाश लोखंडे, गणेश पवार,दगडू शेलार, रंजना कासारे आदी मान्यवर पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका उपस्थित होते, या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा सचिव प्रा.सचिन गवाणे सर यांनी केले. या प्रसंगी सरणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## फुटबॉल पटू राज पाटीलचे शालांत परीक्षेत यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : अनेक विद्यार्थी त्यांच्या शालेय जीवनामध्ये विविध खेळ व स्पर्धांमध्ये यश मिळवत असतात. असाच भिवंडी तालुक्यातील मुऱ्हे सारख्या आदिवासी बहुल, ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थी कुमार राज जयराम पाटील यांनी दहावी शालांत परीक्षा 2025 मध्ये 91% गुण संपादन करून घवघवीत व नेत्रदीपक यश मिळवले आहे.

कुमार राज हा रिटा मेमोरियल कल्याण (वेस्ट),वायले नगर (इंग्रजी माध्यम) या शाळेचा विद्यार्थी असून, त्याला फुटबॉल खेळण्याची प्रचंड आवड व छंद असल्याने त्याने शाळेच्यावतीने गोवा राज्यात झालेल्या फुटबॉल स्पर्धेमध्ये यापूर्वी विशेष प्राविण्य मिळवीत शाळेचे नाव उज्वल केले होते.

त्याने त्याच्या या आवडत्या फुटबॉल क्षेत्राप्रमाणेच,आता दहावी शालांत परीक्षा 2025 मध्ये 90% गुण मिळवून सुयश प्राप्त केले आहे. त्याच्या या नेत्र दीपक यशामध्ये त्याचे शाळेतील शिक्षक शिक्षिका, आई-वडील, आजी-आजोबा व मामा-मामी



यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. दररोज आठ ते दहा तास रात्री उशिरापर्यंत जागून अभ्यास करणाऱ्या राजच्या प्रयत्न फळ मिळाले.

त्याच्या या यशाबद्दल त्याला विचारले असता, मी अभ्यासासाठी अतिशय परिश्रम केले आहे. यासाठी मला जागरण ही करावे लागले होते.परंतु मोबाईल,टीव्ही इत्यादी पासून मी अलिप्त राहून प्रामाणिकपणे अभ्यास केला आणि मला अशाच अपेक्षित पद्धतीचे गुण मिळतील हा आत्मविश्वास होता. असे म्हणत त्यांने पुढे असे सांगितले की, मला इंजीनियरिंग क्षेत्रात करिअर करावयाचे आहे.

राजच्या या यशामुळे शाळा शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षिका, कुटुंब मित्रपरिवार व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी त्याचे अभिनंदन करून, त्याला शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## बंडू खंडागळे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गुरव समाज रायगड ठाणे मुंबई संस्थेच्या सावरसई पेण येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत विद्यमान अध्यक्ष-बंडू विरेश्वर खंडागळे यांची एक मताने पाच वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या सर्वसाधारण सभेत प्रामुख्याने सभेच्या सुरुवातीस दीप प्रज्वलन करून गणपती बाप्पा, श्री महादेव, छत्रपती शिवाजी महाराज, संत काशिबा महाराज, देव देवतांचे पूजन व प्रतिमेस पुष्पहार घालून सभेला सुरुवात झाली. याचवेळी समाज बांधव आणि सीमेवर ज्यांना वीरमरण आल अशा



वीर सैनिकांसाठी सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली.

या सर्वसाधारण बैठकीत समाज बांधवांचे काही कौटुंबिक, वैवाहिक, आर्थिक, व्यावसायिक प्रश्न, तसेच नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या बैठकीतील संपूर्ण गुरव समाज बांधवांसाठी नव्याने सॉफ्टवेअर- ॲप्स तयार झाला असल्याने त्या बाबतीत गुरव बांधवांचे संघटन करण्यासाठी आणि राज्यातील गुरव समाजाची संख्या किती आहे. हे समजण्यासाठी त्याचा फायदा समाज बांधवांना कसा होईल. त्याच बरोबर श्री संत काशिबा महाराज आर्थिक विकास युवा महामंडळ आणि राज्य सरकारकडे प्रलंबित असलेला देवस्थान अधिनियम विश्वस्त कायदा 1950 या बाबतीमध्ये राज्य सरकारच्या माध्यमातून विधेयक दुरुस्ती करण्याबाबत सर्वांना मार्गदर्शन केले. या सर्व साधारण सभेसाठी गुरव समाज रायगड ठाणे मुंबई संस्थेचे अध्यक्ष-बंडू खंडागळे, विजय साळुंके, सुरेश गुरव, रमेश (काका) राजगुरव, रमेश गुरव, सौ रुणाली गुरव, श्रीमती मंदा गुरव, संजय मोरे, रुपेश गुरव, रमेश (बुवा) गुरव, संदीप खंडागळे, रवींद्र गुरव, सचिन गुरव, प्रभाकर भालेराव, सुरेश दळवी, राजेंद्र निळकंठ, रामचंद्र गुरव, विनायक ढवळे, योगेश गुरव, प्रदीप बागुल, संजय गुरव, रमेश खंडागळे, विशाल गुरव, समीर गुरव, देविदास गुरव, नंदकुमार गुरव, हरेश खंडागळे, अमोल गुरव, विजय ठोसर, सौ अमृता ढवळे, भगवान गणेकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## दहावी परीक्षेत द्वारका विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा सन २०२५ चा निकाल संकेतस्थळावर नुकताच जाहिर झाला.कल्याण पूर्वेतील द्वारका विद्या मंदिर नांदिवली या विद्यालयाचा यंदाचाही निकाल १०० % लागला असुन १४० पैकी १०६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले आहेत. १०० टक्के निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे.

कु. प्रिती जाधव हिने शेकडा ९५.०० इतके गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक कु.प्रसाद मोरे ९३.२० टक्के, तृतीय क्रमांक कु. नंदिनी चंदेरे व कु.श्रावणी सावंत प्रत्येकी ९२.४० टक्के, चतुर्थ क्रमांक कु.पाडुरंग चव्हाण व कु. आकाश यादव ९२.०० टक्के या शिवाय वेदांत चव्हाण ९१.८० टक्के ,कु.समृद्धी जाधव या विद्यार्थ्यांनी ९०.२० टक्के इतके गुण प्राप्त करत घवघवीत यश संपादन केले आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. दत्तात्रय दळवी सर व संचालिका सौ.मिरा दळवी मॅडम यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## डोंबिवलीत भाजपा व कै. शाहू सावंत प्रतिष्ठान तर्फे तिरंगा रॅली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : पाकिस्तानच्या दहशतवादी विरोधात देशाच्या जवानांनी ऑपरेशन सिंदुर अभियान अंतर्गत कारवाई करून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले. त्यांच्या या कारवाईला सलाम करत डोंबिवली भाजपा पश्चिम मंडल सचिव तथा कै. शाहू सावंत प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. सर्वेश शाहू सावंत आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पश्चिम मधील सखारामनगर येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालय परिसरात तिरंगा रॅली काढून आनंदोत्सव साजरा केला. परिसरातील नागरिकांना पेढे वाटून सैनिकांच्या शौर्याचा जयघोष करीत भारत माता की जय, वन्दे मातरम् घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा पश्चिम मंडल
अध्यक्ष पवन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भाजपा डोंबिवली (प.) मंडल सचिव डॉ. सर्वेश शाहू सावंत यांच्या नेतृत्वाखाली तसेच कै. शाहू सावंत प्रतिष्ठान समस्त ज्येष्ठ नागरिक, युवा, महिला कार्यकर्ते तसेच भाजपा समस्त पदाधिकारी यांच्या समवेत कैलास बाबाजी पवार (समाजसेवक), गणेश निंबाळकर, केशव अष्टपुत्रे, सखाराम आमणे, रमेश कुलकर्णी, संतोष म्हात्रे, अरुण सावंत, राहुल पाटील, विनायक निवाते, सुधाकर गुळवणी तसेच शोभा दिलीप कुमार सावंत, लीना पॉल जोसफ,मरियम शेख, मनीषा थोरात,पुष्पा खरोसे, अनिता सननाईक, शोभा थोरात यांच्या उपस्थितीत जल्लोषपूर्ण वातावरणात तिरंगा रॅली काढून नागरिकांना पेढे वाटप करण्यात आले.

भारतीय जवानांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील १०० दहशदवाद्यांना यमसदानी पाठविले. यामध्ये नौदल, वायूदल, लष्करांनी पाकिस्तानमधील दहशदवादी तळावर हल्ला करून आतंकवादी मारले याचा आम्हा भारतीयांना अभिमान आहे असे यावेळी डॉ. सर्वेश सावंत यांनी सांगितले. आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा पश्चिम मंडल अध्यक्ष पवन गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखली भाजपा डोंबिवली (प.) मंडल सचिव डॉ. सर्वेश शाहू सावंत यांच्या नेतृत्वाखाली तसेच कै. शाहू सावंत प्रतिष्ठान समस्त ज्येष्ठ नागरिक, युवा, महिला कार्यकर्ते तसेच भाजपा समस्त पदाधिकारी यांच्या समवेत कैलास बाबाजी पवार (समाजसेवक), गणेश निंबाळकर, केशव अष्टपुत्रे, सखाराम आमणे, रमेश कुलकर्णी, संतोष म्हात्रे, अरुण सावंत, राहुल पाटील, विनायक निवाते, सुधाकर गुळवणी तसेच शोभा दिलीप कुमार सावंत, लीना पॉल जोसफ,मरियम शेख, मनीषा थोरात, पुष्पा खरोसे, अनिता सननाईक, शोभा थोरात यांच्या उपस्थितीत जल्लोषपूर्ण वातावरणात तिरंगा रॅली काढून नागरिकांना पेढे वाटप करण्यात आले.

## सिलिंडरच्या स्फोटात दुकाने जळून खाक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील आंबेडकर रोड येथील एका वेल्डिंग दुकानात सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागली, ज्यामुळे आणखी चार दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. या आगीत कोणीही जखमी झाले नाही, परंतु लाखो रुपयांचे सामान जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली.

रविवारी पहाटे साडेपाच वाजता कल्याण पश्चिमेतील आंबेडकर रोडवरील लोहार गली येथील वेल्डिंग दुकानात ठेवलेल्या सिलिंडरचा अचानक स्फोट झाला आणि आग लागली.



**सुदैवाने जीवितहानी नाही**

गौसिया चाळमधील दुकान क्रमांक एक, जिथे क्लासेस चालत होते, ते पूर्णपणे जळून खाक झाले, तर कमरुद्दीन शेख आणि निजामुद्दीन सय्यद यांच्या सोफ्यावरील दुकानाच्या दोन दुकानेही आगीत जळून खाक झाली.

अग्निशमन दलाचे अधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले की, अग्निशमन दलाला सायंकाळी ५:३७ वाजता फोन आला आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पाण्याचे टँकर घटनास्थळी पोहोचले. गॅस सिलेंडरमध्ये उष्णता असल्याने आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याचे त्यांनी सांगितले. हा स्फोट एका वेल्डिंग दुकानात झाला असल्याने, आग आजूबाजूच्या भागात वेगाने पसरली, ज्यामुळे आणखी चार दुकाने जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत जिवित हानी झाली नाही.

## संच मान्यतेचा जीआर रद्द करावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दिनांक 15.03.2024 रोजीच्या शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या संच मान्यतेचा जीआर रद्द करावा व त्यातील असलेल्या जाचक अटी शिथिल कराव्यात त्याच बरोबर राज्यातील माध्यमिक, प्राथमिक शाळा वाचाव्यात, डोंगराळ भागातील व ग्रामीण भागातील शाळांना फायदा व्हावा याकरिता कोकण विभागाचे शिक्षक आमदार माननीय ज्ञानेश्वर म्हात्रे सर, आमदार अभिजीत वंजारी साहेब, आमदार जयंत आजगावकर, आमदार ज. मो. अभ्यंकर साहेब, यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब, राज्याचे शिक्षण मंत्री मा. दादाजी भुसे साहेब, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. रणजीत सिंह देओल साहेब यांचे भेट घेऊन 15.03.2024 चा



आदेश रद्द करावा व राज्यातील सर्व शिक्षकांना दिलासा द्यावा म्हणून भेट घेऊन निवेदन दिले.

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करू नये, व राज्यातील कोणत्याही शिक्षकाचा वेतन थांबवू नये अशी मांगणी सर्व आमदारांनी केली त्यानुसार मा. शिक्षण संचालक यांना शिक्षण मंत्री मा. मंत्री दादाजी भुसे यांनी समायोजन न करण्याचे व कोणत्याची शिक्षकाचे पगार न थांबविण्याचे आदेशित केले.

त्याचबरोबर सर्व आमदारांसमवेत या विषयावर चर्चा करण्याकरिता एक विशेष बैठक लावण्यात येणार असल्याचे मा. शिक्षण मंत्री दादाजी भुसे साहेब यांनी आश्वासित केलेले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024